माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील गट-अ या संवर्गातील श्री जगदीश मोरे, जिल्हा माहिती अधिकारी यांच्या सेवा राज्य निवडणूक कार्यालयातून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात प्रत्यार्पित करून पदस्थापना देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः मावज-२०२५/२५१/प्र.क्र.८२/मावज-२(३४-अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १२ मे, २०२६

**वाचा** :- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१० /कार्या.१२, दि. १६.०२.२०१८
३) सामान्य प्रशासन विभाग, कार्यालयीन आदेश क्र. मावज २०१५/६९/प्र.क्र.१९/३४-अ, दिनांक २७.०२.२०१५
४) अपर मुख्य सचिव (राज्य निवडणूक आयोग) यांच्या मान्यतेची दि. ०९.०४.२०२६ टिप्पणी.

## शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (२) व (३) नुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील गट-अ या संवर्गातील खाली नमूद केलेल्या अधिकारी यांची कामकाजाच्या व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने त्यांच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

**अ) वरिष्ठ सहायक संचालक(माहिती)/जिल्हा माहिती अधिकारी/वरिष्ठ उपसंपादक/जनसंपर्क अधिकारी, गट-अ(वरिष्ठ)**

| अ.क्र. | नाव/ | पदनाम व सध्याचे कार्यालय | बदली नंतरचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. जगदीश त्र्यं.मोरे | जिल्हा माहिती अधिकारी सध्या कार्यरत प्रतिनियुक्तीने जनसंपर्क अधिकारी , राज्य निवडणूक आयोग, मुंबई | वरिष्ठ सहायक संचालक(माहिती)(विभागीय संपर्क कक्ष), मुख्यालय, मुंबई. |

०२. वरील अधिकारी यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे संदर्भ क्र. ४ अपर मुख्य सचिव (राज्य निवडणूक आयोग) यांच्या मान्यतेने श्री.मोरे यांना बदलीच्या पदावर रुजू होण्यासाठी आदेशाच्या दिनांकापासून त्यांच्या रकाना क्र. ३ येथील पदावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर तात्काळ रुजू होऊन आवश्यक अहवाल संबंधित कार्यालयांस तसेच शासनास विनाविलंब सादर करावा. उपरोक्त अधिकाऱ्यांचे **माहे मे, २०२६ पासूनचे वेतन बदली झालेल्या ठिकाणी अदा करण्यात यावे.**

०३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१२१५११३१५१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJAY DHONDBARAO BHOSALE

Digitally signed by AJAY DHONDBARAO BHOSALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=1DA605D815512E5B0901A07F495F12959146D0936CE1AA35F9FA378E1A4D6A87, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BE88F3DC57FA6737970A6A01AEDFBFE6642BB00FC7B162A3142176A6FCCB21CD, cn=AJAY DHONDBARAO BHOSALE
Date: 2026.05.12 15:13:29 +05'30'

**( अजय धों. भोसले )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**<u>प्रति,</u>**

१) उप सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

श्री. जगदीश मोरे यांच्या बदली पर्यायी अधिकारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून तात्काळ उपलब्ध करून देण्यात येईल.

२) संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

श्री. जगदीश मोरे यांना तात्काळ मुख्यालयात रूजू करून घेऊन त्यांच्या बदली राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांना पर्यायी अधिकारी तात्काळ उपलब्ध करून देण्याची कार्यवाही महासंचालनालयाच्या स्तरावर करण्यात यावी.

**<u>प्रत,</u>**

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
२. प्रधान सचिव (मा.व ज.)/ महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), मुंबई, नागपूर,
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
७. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
८. संबंधित अधिकारी (मा.व ज. मार्फत),
९. निवड नस्ती (का.३४-अ)